**राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत मंजूर करण्यात येणारी शिक्षण शुल्काची रक्कम लाभार्थ्यांच्या बँक खात्यात दोन हप्त्यात जमा करण्याची मुदत वाढवून देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : टीईएम-२०१६/प्र.क्र.५५९/तांशि-४**
**मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,**
**हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२.**
**दिनांक: १३ सप्टेंबर, २०१७**

<u>**संदर्भ**</u>**:** १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक **टीईएम २०१६/** प्र.क्र.५५९/तांशि-४, दिनांक १५/०४/२०१६
२) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/ शा.पत्र/(DBT)/२०१७/१४३, दि.३१/०८/२०१७

<u>**प्रस्तावना :**</u>

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना संबंधित शैक्षणिक वर्षाकरीता मंजूर करण्यात येणारी ५० टक्के मर्यादेपर्यंतची शिक्षण शुल्काची रक्कम ही दोन हप्त्यामध्ये लाभार्थी विद्यार्थ्यास देण्यात येईल. त्यापैकी सक्षम प्राधिकाऱ्याकडून पहिला हप्ता हा संबंधित शैक्षणिक वर्षातील ३१ ऑगस्ट पर्यंत व उर्वरित दुसरा हप्ता ३१ जानेवारी पर्यंत लाभार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात जमा करण्यात येईल अशी तरतूद शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.टीईएम-२०१६/प्र.क्र.५५९/तांशि-४, दिनांक १५/४/२०१७ मध्ये करण्यात आली आहे.

२. मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी एसएलपी (सी) क्र.२६०६८ ऑफ २०१२ (सी.ए.नंबर ९०४८/२०१२) मध्ये दिनांक १३/१२/२०१२ रोजी दिलेल्या आदेशान्वये प्रवेश प्रक्रीयेची कट ऑफ डेट ही संबंधित शैक्षणिक वर्षातील १५ ऑगस्ट ही निश्चित करुन दिली होती. परंतु १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनाची सार्वजनिक सुट्टी असल्यामुळे १४ ऑगस्ट ही राज्यातील प्रवेश प्रक्रीयेची कट ऑफ डेट ग्राह्य धरण्यात येत होती. तथापि, इयत्ता १० वी व १२ वी च्या मार्च च्या परीक्षेत अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची फेर परीक्षा निकाल लागल्यानंतर जुलै मध्ये घेण्यात येते व फेर परीक्षेचा निकाल ऑगस्ट अखेरपर्यंत जाहीर होतो. या फेर परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत प्रवेश प्रक्रीयेची कट ऑफ डेट वाढवून मिळण्याकरीता मा.सर्वोच्च न्यायालयात संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत याचिका दाखल ( क्र.आय.ए.६२०३३/२०१७ इन एम.ए. नंबर ३९१/२०१७ इन सी.ए. नंबर ९०४८/२०१७) करण्यात आली होती. या याचिकेवर दि. ०८.०८.२०१७ रोजी झालेल्या सुनावणीत मा.सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील प्रवेश प्रक्रीयेची कट ऑफ डेट संबंधित शैक्षणिक वर्षातील ३१ ऑगस्ट पर्यंत वाढवून दिली आहे. त्यानुसार प्रवेश प्रक्रीया दिनांक ३१ ऑगस्ट पर्यंत सुरु ठेवणे आवश्यक आहे. प्रवेश प्रक्रीया संपल्यानंतर उपरोक्त योजनेसाठी पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन (महाडीबीटी पोर्टलव्दारे ) भरुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे. प्राप्त अर्जांची संस्था स्तरावरुन तपासणी करुन संबंधित विभागीय कार्यालयाकडे वर्ग करण्यात येते, विभागीय कार्यालयांनी त्यांना प्राप्त झालेल्या

अर्जाची छाननी केल्यानंतरच निश्चित लाभार्थी विद्यार्थी संख्या व त्यांना देय ठरत असलेल्या शिष्यवृत्तीची रक्कमेची आकडेवारी उपलब्ध होईल. हया प्रक्रीयेला काही कालावधी लागू शकतो. सदरहू वस्तुस्थिती विचारात घेता उपरोक्त योजनांसाठी पूर्वी निर्धारित करण्यात आलेल्या शिष्यवृत्तीचा पहिला हप्ता हा संबंधित शैक्षणिक वर्षातील ३१ ऑगस्ट पर्यंत विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करणे शक्य होत नाही. त्यामुळे ही मुदत सप्टेंबर अखेरपर्यंत अथवा ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवडयापर्यंत तसेच दुसरा हप्ता संबंधित शैक्षणिक वर्षातील फेब्रुवारी अखेरपर्यंत वाढविण्यात यावा, असे संचालक, तंत्र शिक्षण यांनी संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये प्रस्तावित केले आहे.

३. संचालक, तंत्र शिक्षण यांनी त्यांच्या संदर्भाधिन पत्रात नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन त्यांनी प्रस्तावित केल्यानुसार शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक टीईएम-२०१६/ प्र.क्र.५५९/तांशि-४, दिनांक १५ एप्रिल,२०१७ च्या परिच्छेद क्र.५ मध्ये, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना संबंधित शैक्षणिक वर्षाकरीता मंजूर करण्यात येणारी ५० टक्के मर्यादेपर्यंतची शिक्षण शुल्काची रक्कम दोन हप्त्यांमध्ये, पहिला हप्ता ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवडयापर्यंत व दुसरा हप्ता संबंधित शैक्षणिक वर्षात फेब्रुवारी अखेरपर्यंत लाभार्थ्यांच्या आधार संलग्नीत बँक खात्यात जमा करण्यात येईल, अशी सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक टीईएम-२०१६/ प्र.क्र.५५९/तांशि-४, दिनांक १५ एप्रिल,२०१७ च्या परिच्छेद क्र.५ मध्ये, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना संबंधित शैक्षणिक वर्षाकरीता मंजूर करण्यात येणारी ५० टक्के मर्यादेपर्यंतची शिक्षण शुल्काची रक्कम दोन हप्त्यांमध्ये लाभार्थी विद्यार्थ्यास देण्यात येईल. त्यापैकी सक्षम प्राधिकाऱ्याकडून पहिला हप्ता हा संबंधित शैक्षणिक वर्षातील ३१ ऑगस्ट पर्यंत व उर्वरित दुसरा हप्ता ३१ जानेवारी पर्यंत लाभार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात जमा करण्यात येईल, अशी तरतूद आहे. आता हया तरतूदीत शासन या आदेशाव्दारे पहिला हप्ता ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवडयापर्यंत व दुसरा हप्ता संबंधित शैक्षणिक वर्षात फेब्रुवारी अखेरपर्यंत लाभार्थ्यांच्या आधार संलग्नीत बँक खात्यात जमा करण्यात येईल, अशी सुधारणा करीत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्धकरुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१७०९१३१५२५०७५१०८ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

Madan Maruti Morve

Digitally signed by Madan Maruti Morve
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2efbf911362ce57b361b7f36471cb98eb98ed47e7de8b061211b9d7e6e0fc2e3, cn=Madan Maruti Morve
Date: 2017.09.13 17:21:00 +05'30'

( म. मा. मोरवे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई

२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग , मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव (कृषि), कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सचिव (प.दु.म.), कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई
८. सचिव, सामाजिक न्याय व विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. सर्व सन्मानीय विधानपरिषद व विधानसभा सदस्य
११. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे,
१२. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक
१३. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी,अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
१४. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी,अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
१५. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
१६. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१७. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१८. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१९. आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे
२०. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२१. आयुक्त, मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२२. संचालक, पशु संवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
२३. कुलगुरु, सर्व विद्यापीठे
२४. कुलगुरु,महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
२५. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
२६. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
२७. सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व)
२८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
२९. सर्व जिल्हाधिकारी
३०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
३१. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
३२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

३४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
३५. सर्व संबंधित मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
३६. उप सचिव (मशि/विशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
३७. अवर सचिव (तांशि-३), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
३८. कक्ष अधिकारी (मशि-२/मशि-४/ तांशि-५), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
३९. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
४०. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक
४१. निवडनस्ती/तांशि-४